डी. बी. जे. महाविद्यालय, चिपळूण.

## —बीसी BC (SC/ST/VJ-NT/SBC) / ओबीसी (OBC) ) / ओपन (Gen) शाहू महाराज शिष्यवृत्ती इ. सवलत घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्वाची सूचना—

ज्या विद्यार्थ्यांनी कनिष्ठ (Jr.) व वरिष्ठ (Sr.) महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२३—२०२४ या वर्षामध्ये वरील प्रवर्गातून सवलत घेऊन प्रवेश घेतला आहे, अशा विद्यार्थ्यांनी भारत सरकार शिष्यवृत्ती (Scholarship), शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क (Freeship) इ.योजनांचे अर्ज महाराष्ट्र शासनाच्या https://mahadbt.maharashtra.gov.in या महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन भरून त्याची प्रिन्ट व आवश्यक कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतीसह महाविद्यालयाच्या कार्यालयात लिपीक श्री. प्रताप जाधव यांचेकडे Verification/Scrutiny साठी जमा करणे आवश्यक आहे. शिष्यवृत्तीचा ऑनलाईन फॉर्म भरण्याची अंतिम तारीख ३० एप्रिल २०२४ आहे. अंतिम तारखेनंतर मुदत वाढविण्यात येणार नाही.

ज्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षी २०२२—२३ मध्ये शिष्यवृत्तीचे ऑनलाईन अर्ज भरले होते परंतु अर्जामधील काही त्रुटींमुळे सदर अर्ज महाविद्यालयाकडून Sent back to Student करण्यात आले होते. अशा विद्यार्थ्यांकरीता पुन्हा अर्जामध्ये दुरूस्ती करण्याची मुदत वाढ दि ३० एप्रिल २०२४ पर्यत देण्यात आली आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षी फॉर्म भरले असतील त्यांनी शैक्षणिक वर्ष २०२३—२४ मध्ये सदर अर्जाचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे तसेच ज्या विद्यार्थ्यांनी स्कॉलरशीप/फ्रिशीपचे ऑनलाईन अर्ज भरलेले आहेत, परंतु अद्याप काऊंटर क्र. ३ येथे Verification/Scrutiny साठी जमा केले नसल्यास अश्या विद्यार्थ्यांनी ते त्वरीत जमा करावेत.

ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा ऑनलाईन फॉर्म भरावयाचा नसल्यास अशा विद्यार्थ्यांनी पालकांचे हमीपत्र महाविद्यालयात जमा करून महाविद्यालयाची संपूर्ण वर्षाची फी कॅशकाऊंटरवर भरावी. हमीपत्राचा नमुना काउंटर क्र. ३ येथे श्री. प्रताप जाधव यांच्याकडे उपलब्ध आहे.

शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर शासनाकडून मिळणारी स्कॉलरशीप/फ्रीशीपची ६० टक्के रक्कम DBT नुसार थेट विद्यार्थ्यांच्या आधार लिंक असलेल्या बॅंक खात्यामध्ये जमा केली जाते. सदरची रक्कम विद्यार्थ्यांनी त्यांच्या बॅंक खात्यामध्ये जमा झाल्यानंतर ०७ दिवसाच्या आत महाविद्यालयामध्ये जमा करून महाविद्यालयाची उर्वरीत फी भरणे व रितसर पावती प्राप्त करून घेणे बंधनकारक आहे.(फक्त अनुदानित (Aided/Grantable) वर्ग/तुकडयांकरीता) विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती जमा झाल्याचा स्टेटस स्वत:च्या लॉगीनमध्ये पहावा .

विद्यार्थ्यांनी अंतिम तारीखेची वाट न पाहता लवकरात लवकर अर्ज भरावयाचे आहेत. शिष्यवृत्तीचा ऑनलाईन फॉर्म न भरला गेल्यामुळे शिष्यवृत्ती न मिळाल्यास किंवा महाविद्यालयाची संपूर्ण वर्षाची फी भरावी लागल्यास त्यास विद्यार्थी स्वत: जबाबदार राहतील याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

D.B.J. COLLEGE
NAAC RE ACCREDITION
Chiplun

(डॉ. एम. एस. बापट)
PRINCIPAL
D.B.J.College, Chiplun

दिनांक:— 4 APR 2024